UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

CURRENT GLOBAL REVIEWER

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

# CURRENT GLOBAL REVIEWER

| Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143 |


# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | *Synthesis of Some Substituted Phenyl Methylene Bis Indole Using nickel Aluminum Oxide* | *Shashikant A. Kadam, Ravindra S. Shinde* | 1 |
| 2 | *The Suggestive Discription Of Motivation-An Important Management Function In The Organization Scenario* | *Dr. Prashant M. Puranik* | 4 |
| 3 | *Format of Mock Trial in Vijay Tendulkar's Play "Silence! The Court is in Session"* | *Mr.Bobade Tukaram Balasaheb* | 8 |
| 4 | *Use of ICT for the Research in health and education field* | *Rekha B. Lonikar* | 13 |
| 5 | *Use of Information and Communication Technology (ICT) in the Library* | *Dr. Mortale Heera Nivrattirao* | 15 |
| 6 | *"Effect of Demonetization Policy on 'Weaker Sections ofIndian Society."* | *Dr. Shyamsundar Pandharinath Waghmare* | 18 |
| 7 | *Medical Library Cosortium* | *Devidas Vankati Phad* | 22 |
| 8 | *Process of rehabilitation with reference to Warana irrigation project of Maharashtra* | *Mr. M. B. Chavan* | 27 |
| 9 | *Effect Of Selected Exercises On Arm And Back Strength Of Archers* | *Dr. Sunil kumar* | 33 |
| 10 | *Role of Foreign Direct Investment (FDI) In Banking Sector* | *Syed Vazaeer Syed Isa* | 42 |
| 11 | *Status of Organic Farming and Insurance Research Experiences in Rice* | *Dr. Rakesh Patidar, Dr. Dheeraj Negi Director Pragyan* | 45 |
| 12 | नारी तुम क्या हो ......? | विद्या किशनराव सावते | 48 |
| 13 | मराठवाडा के प्रमुख संत | सहा. प्रा. डॉ. बालाजी महाळंकर | 53 |
| 14 | "स्त्रीभ्रूणहत्येचा तात्त्विक अन्वयार्थ " | प्रा. बाजीराव पाटील | 57 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II, Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143


| | | | |
|---|---|---|---|
| | | प्रा. नयन भादुले–राजमाने | 61 |
| 15 | भारतीय राज भाषाऐं एवं संविधान | डॉ.सतीश बाबुराव डोंगे | 70 |
| 16 | महिलांचा आर्थिक विकास आणि उद्योजकता | पंडगे संतोष रमेशराव | 74 |
| 17 | ॲरिस्टॉटलच्या 'नैतिक सदगुण' संकल्पनेचा अन्वयार्थ | प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने | 77 |
| 18 | ग्रामीण साहित्य संकल्पना व स्वरूप | प्रा.मरेवाड पी.पी. | 81 |
| 19 | विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा विकासासाठी कार्यक्रमनिर्मितीचा अभ्यास | डॉ.पी.जी. राठोड | 86 |
| 20 | स्त्री उत्थानातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या कार्य व चळवळीचे योगदान | | |
| 21 | नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथालेखनातील स्त्रीजीवन | प्रा.डॉ.लक्ष्मण ना.वाघमारे | 89 |
| 22 | 'ग्रामीण साहित्य' हा वेगळा प्रवाह कशासाठी ? | प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत | 92 |
| 23 | सामाजिक संशोधन पध्दतीचा चिकित्सक अभ्यास | मुरगे एम.यु | 95 |
| 24 | जलयुक्त शिवार अभियान : एक वरदान | प्रा. डॉ. हरी साधु वाघमारे | 98 |
| 25 | जॉ पॉल सार्त्रचा अस्तित्ववाद : एक मुकतचिंतन | रोहित सुधाकर गायकवाड | 102 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly Nov. 2017-Apr. 2018 | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue X Vol II , Jan. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# जॉ पॉल सार्त्रचा अस्तित्ववाद : एक मुकतचिंतन

**रोहित सुधाकर गायकवाड**

सोनोपंत दांडेकर कला, वा. श्री. आपटे वाणिज्य व एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर

-------------------(25)-------------------

**प्रस्तावना:**

जॉ पॉल सार्त्र हा प्रसिध्द फ्रेंच तत्त्वचिंतक साहित्यीक व कांदबरीकर असून तो अस्तित्त्वादाचा खंदा समर्थक मानला जातो. त्यांनी आपल्या प्रसिध्द Being and Nothingness, Existentialism and Humanism, The Psychology of Imagination, The Transcendence of Ego हे ग्रंथ Nausea (No exit (Drama) व Words (Autobiography) इत्यादी तत्त्वज्ञानात्मक ग्रंथातून व साहित्यातून आपल्या अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचे सखोल तात्विक विश्लेषण केले आहे.

अस्तित्ववादाचा उगम मूळत: हेगेलियन चिद्‌वादाच्या बंदिस्त तत्त्वज्ञानाच्या विरोधी बंडाचा भावनेतून झाला. या बंडाचा ध्वज सोरेन किर्केगार्ड या डॅनिश तत्त्वचिंतकाने फडकावला. सोरेन किर्केगार्डचे समकालिन तत्त्वचिंतक हेगेलच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित झाले होते. कारण सत (Reality) च्या वस्तुनिष्ठेचा उद्‌घोष हेगेलच्या तत्त्वज्ञानाच दिसून येतो. हेगेलच्या बंदिस्त तत्त्वज्ञानाने किर्केगार्डचे समाधान झाले नाही. हेगेल बदल योग्य आदर असून ही हेगेलची तात्विक विचार सरणी त्याला हास्यस्पद वाटू लागली. अस्तित्वादी तत्त्वज्ञानात अस्तित्व या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण अस्तित्व याचा अर्थ स्वत:ला उल्लघने असतेपणाचा नकार व नसते पणाची ओढ, अभाव, पोकळी, रिक्तता असा होतो. त्यामुळे सार्त्र असे प्रतिपादन करतात की, अस्तित्व हा शब्द केवळ मानवी जीवनाच्या संदर्भात अर्थपूर्ण ठरतो. कारण माणसात अभाव, पोकळी, नसतेपण व रिक्तता असते. ती त्याला सतत भेडसावत असते आणि मग ती रिक्तता, पोकळी भरून काढण्यासाठी प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या असतेपणाचा नकार करते व जे आता नाही ते होण्याचा प्रयत्न करते. म्हणूनच सार्त्र म्हणतात, "भविष्यातील मानवी प्रक्षेपण म्हणजे अस्तित्व होय." म्हणूनच खऱ्या खुऱ्या अर्थाने माणूस हाच अस्तित्वात असतो. म्हणून अस्तित्व हा शब्द केवळ आणि केवळ मानवी जीवनाला लावता येतो. कारण मानवाच्या ठिकाणी अधिक उणे असे असते. परंतु जड वस्तु किंवा भौतिक वस्तुच्या संदर्भात अस्तित्व हा शब्द आपणास वापरता येत नाही. कारण जड वस्तु उदा- टेबल, खुर्ची, दगड, धोंडे केवळ असतात. त्यात अधिक-उणे असे कांहीहि नसते. तसेच जड वस्तुच्या ठिकाणी स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव मूळीच नसते. तसेच जड वस्तुला भविष्यकाळ नसतो. त्यांना भविष्यात डोकावता येत नाही. म्हणून सार्त्रच्या मते अस्तित्व हा शब्द दगड, धोंडे, टेबल, खुर्च्यांना लावता येत नाही. तो केवळ मानवी अस्तित्वाच्या संदर्भातच अर्थपूर्ण ठरतो.

मानवी जीवन व त्याच्या अन्वयार्थाचा शोध घेऊ पाहणाऱ्या काही वैचारिक विचारसरणी अस्तित्ववाद या नावाने ओळखल्या जातात. अस्तित्ववादी भुमिकेत काही तत्त्वज्ञ ईश्वरवादी तर काही तत्त्वज्ञ निरीश्वरवादी असल्याने त्यांच्या अस्तित्ववादी भूमिकेत काही प्रमाणात मत भिन्नता दिसून येते. सोरेन किर्केगार्ड, कार्ल यास्पर्स, हायडेगर, मार्टिन बुबेर, गॅब्रीयल मार्सेल, जॉ पॉल सार्त्र इत्यादी तत्वचिंतक म्हणून ओळखले जातात. विशेषत: सार्त्र या अस्तित्ववादी तत्त्वचिंतकाने कथा, कादंबऱ्या व नाटक यासारख्या साहित्यप्रकाराच्या माध्यमातून आपल्या

अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. अस्तित्ववादी तत्त्वाज्ञानात मानव हाच चिंतनाचा केंद्र बिंदु आहे असे असले तरी त्याच्या मानवी अस्तित्व विषयक भुमिकेमध्ये फरक आहे. त्यांचे प्रमुख्र कारण काही अस्तित्ववादी तत्त्वचिंतक ईश्वरवादी आहेत तर काही निरीश्वरवादी आहे. सोरेन किर्केगार्ड, कार्ल यास्पर्स, मार्टिन बुबेर, गॅब्रीयल मार्शल हे ईश्वरवादी तत्त्वचिंतक आहेत पण नित्शे, हायडेगर, सार्त्र हे मात्र निरीश्वरवादी तत्त्वचिंतक आहेत. याचा परिणाम त्यांच्या अस्तित्वविषयक भूमिकेवर झालेला दिसून येतो. अस्तित्ववादातील काही तत्त्वचिंतक ईश्वरवादी व काही निरीश्वरवादी असले तरी सर्वच अस्तित्त्वाद्यांच्या चिंतनाने मुळ सुत्र "अस्तित्व अगोदर व सारतत्त्व नंतर" हे आहे. या संदर्भात अस्तित्व हा शब्द केवळ मानवी अस्तित्व या अर्थाने अस्तित्ववाद्यांना अभिप्रेत आहे. तर Essence म्हणजे सारतत्त्व या संकल्पनेचे विश्लेषण आपणास एक उदाहरण घेवून करता येईल. उदा- एखादा अडकित्ता निर्माण होण्यापूर्वी म्हणजेच मुर्त स्वरुपात येण्या अगोदर त्या अडकित्ता घरातील पाणपुडयात ठेवायचा आहे की पाण्याच्या ठेल्यावर वापरायचा आहे या सर्व बाबींवर आपणास त्या अडकित्याचे सारतत्व म्हणजे Essence म्हणता येईल. अडकित्त्याचे हे सारतत्त्व अडकित्ता निर्माण होण्यापूर्वी किवा अडकित्ता बनविणाऱ्या कारागिराच्या मनात अमुर्त स्वरुपात असतो. आधी त्याच्या मनात किंवा मेंदूत असलेल्या सर्व सारतत्त्वाच्या आधारावर तो लोखंड, सोने, चांदी इत्यादी धातूच्या माध्यमातून अडकित्त्यास मुर्त स्वरुप देत असतो. याचाच अर्थ अडकित्याचे वस्तु सार अर्थात Essence निर्माण झाल्याशिवाय अडकित्ता निर्माण होत नाही. म्हणून या वस्तुच्या बाबतीत सारतत्व अगोदर व अस्तित्व नंतर हे सुत्र लागू पडते. परंतु मानवी अस्तित्वच्या संदर्भात अस्तित्व व सारतत्त्व नंतर हे सूत्र लागू पडते.

सार्त्रने आपल्या अस्तित्ववादी तत्त्वज्ञानात १) Pour Soi मानवी अस्तित्व किंवा जाणीवरुप सत्ता, २) en-soi स्वगत सत्ता म्हणजेच स्वहेतुक सत्ता व स्वगत सत्ता अशा प्रकारचा फरक केलेला दिसून येतो. परंतु सार्त्रच्या मते, खऱ्या खुऱ्या अर्थाने स्वहेतुक सत्ता म्हणजेच मानवी अस्तित्व अस्तित्वात असते. म्हणून स्वगत सत्ता ही जड वस्तुची दगड धोंडयाची सत्ता असल्याने ती खऱ्या खुऱ्या अर्थाने अस्तित्वात नसते. ती फक्त असते. म्हणून सार्त्र सारतत्त्व अगोदर व अस्तित्व नंतर हा क्रम स्वगत सत्तेला देतो. मात्र या उलट अस्तित्व अगोदर व सारतत्त्व नंतर हे स्वहेतुक सत्तेचे म्हणजेच pour-soi मुलभूत सुत्र असल्याने खऱ्या अर्थाने अस्तित्वावादी तत्वज्ञान Pour-soi स्वहेतुक सत्तेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण स्वहेतुक सत्ताच म्हणजे मानवी अस्तित्व होय. म्हणून सार्त्रने आपल्या अस्तित्ववादी तत्त्वज्ञानात स्वहेतुक सत्तेला Being for itself ला अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा केंद्र मानला आहे.

अ) सार्त्रच्या मते, मी माझ्या स्वत: मध्ये बंदिस्त राहू शकत नाही. माझे मी पण मला या बंदिस्त पणाच्या बाहेर येण्यास भाग पाडते. असे प्रतिपादन करुन सार्त्रने हेगेलच्या चिद्वादी बंदिस्त तत्वज्ञानातून बाहेर पडण्यासाठी माणसाला निवडीचे स्वातंत्र्य, नकाराचे स्वातंत्र्य व अनिर्बंध स्वातंत्र्य देऊ केले. त्यांच्या मते व्यक्तिला तिच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही पर्यायाची अनिर्बंधपणे निवड करता येते. या अनिर्बंध निवडीपासून ईश्वर सुद्धा मला रोकू शकत नाही. कारण तो मेला आहे. अशी घोषणा सार्त्र करतो आणि माणसाला अनिर्बंध स्वातंत्र्य देतो. माणसाला लाभलेल्या या अनिर्बंध स्वातंत्र्यामुळे तो फकत निवडच करत राहतो. त्याची ही निवड स्वैरपणे केलेली असते. या निवडीमुळे त्याच्यावर येणारे उत्तरदायित्व स्वत:च्या शिराव तो न घेता तो परिस्थिती, समाज इत्यादीच्या माथी मारून स्वत:वर आलेल्या जबाबदारी पासून पळ काढतो. या संदर्भात सार्त्र असे प्रतिपादन करतात की, मी

स्वातंत्र्याची शिक्षा भोगत आहे . स्वातंत्र्य माझ्या मानगुटीवर बसले आहे. सार्त्रने मानवाला दिलेले अनिर्बंध स्वातंत्र्य हा मानवी जीवनाचा दारून असा पराभव ठरतो.

सार्त्रने निवडीच्या स्वातंत्र्याचा ही उद्घोष केला आहे. पण ही निवड करताना मानसाने आपली जाणीव सतेज ठेवावी. ज्यावेळी व्यक्तिच्या समोर अनेक पर्याय उभे असतात. त्यावेळी आपण कोणत्या पर्यायाची निवड करावी हे व्यक्तिला कळत नाही. अशा वेळेस सार्त्र म्हणतो, आपण आपल्या सद्सद् विवेक बुध्दिला वाट पुसावयास हवी. या संदर्भात सार्त्रने एका विद्यार्थ्याचे उदा- दिले आहे. या विद्यार्थ्यापुढे एक विचित्र समस्या उभी होती. तो त्याच्या आईजवळ राहत होता. आईचे आणि वडीलांचे संबंध चांगले नसल्यामुळे वडील वेगळे राहत होते. जर्मनांनी १९४० साली फ्रान्सवर केलेल्या हल्यात त्याचा थोरला भाऊ मारला गेला होता. भावाच्या मृत्यूचा सूड घेण्याची त्याची इच्छा होती. त्यासाठी तो इंग्लला जाऊन फ्रेंच मुक्ती सेनेत दाखल व्हावा, असे त्यास वाटत होते. परंतु त्याला आईची काळजी वाटत होती. आपल्या वाचून तीला कोणीही नाही हे त्याला समजत होते. आपण आईजवळ राहिल्यास आईचे जीवन निश्चितपणे सुसाह्य होईल, ही गोष्ट त्याला दिसत होती. याउलट फ्रेंच मुक्तीसेनेत दाखल झाल्यानंतर ही भावाच्या मृत्यूचा सूड घेता येईलच अशी शाश्वती त्याला वाटत नव्हती. कदाचित तो इग्लंडलाही पोहोचू शकला नसता. कदाचित त्याला कारकुनिच करावी लागली असती. अशा रितीने सार्त्रच्या मते निवडीच्या स्वातंत्र्यात व्यक्तिला स्वत:च्या स्वप्रेरणेचा आधार घ्यावा लागतो. तसेच या स्वातंत्र्यात परिवेदना व दु:खाच्या तीव्र भावना निर्माण होतात. परंतु व्यक्तिला या भावनेला आवर घालावा लागतो. उदा- जेव्हा लढाई सुरु होते तेव्हा सेनापतीला आपल्या सैन्याला लढण्यासाठी हूकूम देतो. हा लढण्याचा हूकूम देताना सेनापतीने युध्दाच्या पर्यायाची निवड केल्यामुळे त्याच्या मनात दु:खाची परिवेदना होते. कारण सीमेवर लढायला चालेले सैनिक यातले काही मारले जाणार यामुळे त्याला होणारे दु:ख आवरावे लागते. यात अपरिहार्यतेची व नाईलाजाची भावना असते. निवडीच्या स्वातंत्र्याप्रमाणे सार्त्रने व्यक्तिला नकाराचे स्वातंत्र्य देऊ केले. याप्रकारात सार्त्रवर देकार्तचा प्रभाव दिसून येतो. दकार्तने ही मी च्या अस्तित्वावर संशय घेतला पण त्याची सिध्दता करण्यासाठी त्याने मी विचार करतो म्हणून मी आहे या सत्रातील अगोदर सारतत्व व अस्तित्व नंतर हा क्रम सार्त्रला मान्य नाही. म्हणजेच मी अस्तित्वात आहे म्हणून मी विचार करतो. सार्त्रला अभिप्रेत असलेला नकार स्वगत सत्तेचा Being ज्ञin-it-self म्हणजे eb-soi आहे. वरील लाभलेल्या तीन ही स्वातंत्र्यामुळे व्यक्तिवर येणारी जबाबदारी सार्त्रच्या मते व्यक्तिगत नसते तर ती सामुहिक असते. हे उत्तरदायित्व स्वत:च्य शिरावर घेऊन पार पाडले पाहिजे असा सार्त्र आग्रह धरतो. ज्या व्यक्ति आपल्या उत्तरदायित्वापासून दूर पडतात त्या आत्मवंचित जीवन जगतात. या आत्मवंचित जीवनात व्यक्तिच्या मन व शरीराची फारकत होते असे सार्त्र म्हणतो. या आत्मवंचित जीवनात व्यक्ति तिला लाभलेल्या अनिर्बंध स्वातंत्र्यामुळे येणारी जबाबदारी टाळते व स्वत:ला वस्तुरुप बनवते. सार्त्रने अंधश्रध्देचे आत्मवंचित जीवन, परिस्थितीवश आत्मवंचित जीवन व समर्पित आत्मवंचित जीवन असे आत्मवंचित जीवनाचे तीन प्रकार करुन व्यक्तिने त्या तीन ही आत्मवंचित जीवनातून सुटका करुन घेऊन अस्सल (पुरुषार्थ) युक्त जीवन जगण्याचा सल्ला अखील मानव जातीला दिला आहे. सार्त्रच्या मते, पुरुषार्थयुक्त जीवन हे जबाबदार युक्त जीवन असल्याने त्याचा प्रत्येक व्यक्तिने अंगीकार करावा व आत्मवंचित जीवनातून स्वत:ची सुटका करून घ्यावी.

सार्त्र हा निरीश्वरवादी तत्वचिंतक असल्याने तो प्रसिद्ध आअस्तित्ववादी तत्वचिंतक नित्शे या प्रमाणे ईश्वर मृत झाला आहे असे म्हणतो. कारण ईश्वर मानल्यामुळे मानवी स्वातंत्र्याला बाधा पोहचेल. पर्यायाने मानवी स्वातंत्र्य हिरावून घेतले जाईल. तसेच तार्तिक युक्तिवादाने इाश्वराचे अस्तित्व आपणास सिद्ध करता येत नाही. म्हणून त्याने ईश्वराचे अस्तित्व नाकारुन ईश्वर हा नैतिक मुल्याचे उगम स्थान आहे हे नाकारुन ईश्वराची संकल्पनाच मुळात आत्मघाती असल्याने ती त्याने नाकारली आणि ईश्वर होण्याची मानवाची दुर्दम्य आकांक्षा कधीही पुर्ण होणार नाही असे प्रतिपादन केले व ईश्वर संकल्पनेमुळे चिद्वादी बंदिस्त तत्वज्ञानाने मानवी जीवनभोवती निर्माण केलेली अभेद्य भिंत नाकारली आहे.

त्याचप्रमाणे सार्त्रने आपल्या अस्तित्ववादी तत्वज्ञानात मृत्यू या संकल्पनेचे सखोल विश्लेषण केले आहे. सार्त्रच्या मते, 'जन्म हा मानवी जीवनाचा आरंभ बिंदू असून मृत्यू हा पुर्णविराम आहे.' असे प्रतिपादन करून जन्माच्या अगोदर व मृत्यूच्या नंतरचे जीवन त्याने अमान्य केले. सार्त्रच्या मते तात्विक चर्चेतील मृत्यू आपण जेव्हा गंभीर आजारी पडू त्यावेळी जीवनाच्या कडेवर उभा राहतो. तेव्हा मृत्यूची खरी भिती माणसाला वाटत असते. मृयू या संकल्पनेचे मानवी मनातील भिती दूर करण्यासाठी भारतीय व पाश्चात्य दर्शनातील अनेक विचारवंतांनी, संतांनी प्रयत्न केलेले आहेत. उदा. मृत्यू म्हणजे दोन जन्मातील विश्रांती होय. तसेच आत्मा मरत नाही तर जीर्ण झालेले शरीर नष्ट होते व आत्मा अमर आहे. अशा संकल्पनेला सार्त्रच्या तत्वज्ञानात किंचित ही स्थान नाही. त्याच्या मृत्यूविषयक संकल्पनेच्या विवेचनात मृत्यू या घटनेपेक्षा मृत्यूच्या तीव्र जाणीवेला अधिक महत्व आहे. सार्त्र एखाद्या व्यक्तिच्या मृत्यूनंतर त्या व्यक्तिने अमूक अमूक केले असते ती ती व्यक्ति आणखीन जगली असती, तर अशा विधानांना सार्त्र निरर्थक मानतो व मृत्यू मानवी जीवनाला अर्थ प्राप्त करून देत नाही. तर माणसाच्या संपूर्ण प्रलंबनावर (योजनेवर) पाणी फिरवतो. म्हणून मृत्यू हे मानवी जीवनावरील महान संकट आहे. असे सार्त्र प्रतिपादन करताना दिसतो.

सार्त्रने मृत्यूचे हौतात्म्य किंवा आत्महत्येने येणारा मृत्यू , वार्धक्याने आजारपण किंवा मृत्यूदंडामुळे येणारा मृत्यू व तडका फडकी किंवा अपघाताने येणारा मृत्यू असे मृत्यूचे तीन प्रकार केले आहेत. परंतु या तीन ही प्रकारात कोणत्याही व्यक्तिची मरणासाठी मानसिक तयारी झालेली नसते. हे मरण त्या व्यक्तिवर लादलेले असते, या तीन ही प्रकारात व्यक्तिची मृत्यूसाठी मुळीच तयारी झालेली नसते.

अशा प्रकारे सार्त्रने आपल्या अस्तित्ववादी तत्वज्ञानात मानवी स्वातंत्र्याचा उद्घोष करून बंदिस्त तत्वज्ञानामुळे मानसाचे हरवले गेलेले मी पण किंवा स्वत्व याची पुन: प्रस्थापना केली. ही सार्त्रने अस्तित्ववादी तत्वज्ञानातून जगाला दिलेली महान देण आहे असे मला वाटते.

**संदर्भ सुची :**

१. Jean Paul Sartre, Philosopher Without Faith, Wisdom Library, ३ New York, १९६१ Alberes, R. M.

२. Introduction to Modern Existentialism, Grove Press, New york, १९६२. Breisach, Ernst.